महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
बुधवार दि.२५/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२५
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## सहा महिन्यानंतरही हैदराबाद गॅझेटियरची कार्यपद्धती निश्चित नाही, सरकारकडून नवीन समिती

# मराठा आरक्षणात दिरंगाई!

**मुंबई । वृत्तसेवा**

**मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र तब्बल सहा महिन्यांनंतरही या संदर्भातील स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळेच कुणबी प्रमाणपत्रांसाठी अर्ज कमी येत आहेत, अशी कबुली सरकारने २० फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशातून दिली आहे.**



सरकारने मान्य केले आहे की, कार्यपद्धती निश्चित नसल्यामुळे अर्ज कमी प्रमाणात दाखल होत आहेत, तसेच प्रमाणपत्रांचे वाटपही अत्यल्प झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता नवी समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती आवश्यक कार्यपद्धती तयार करणार आहे. कार्यपद्धती तयार झाल्यानंतर ती राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. मंजुरीनंतरच प्रमाणपत्र वितरण प्रक्रियेला गती मिळेल, अशी माहिती अधिकृत आदेशातून समोर आली आहे. रम्यान, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली असून समितीमार्फत कार्यपद्धती लवकरात लवकर निश्चित केली जाईल, असे संकेत दिले आहेत. दरम्यान, डिसेंबर २०२५ मध्ये समोर आलेल्या आकडेवारीनुसार, तीन महिन्यात मराठवाड्यातील केवळ ९८ जणांना ओबीसी प्रमाणपत्र मिळाल्याचं समोर आलं. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातून केवळ ५९४ अर्ज आले होते. पण, त्यातील केवळ ९८ जणांना ▶▶ पान २ वर

### विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली समिती

छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या देखरेखीखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. संबंधित समिती हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर कार्यपद्धती ठरवणार आहे.

### सहा महिन्यांच्या विलंबावर प्रश्नचिन्ह

सरकारने आंदोलनानंतर तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सहा महिन्यांनंतरही कार्यपद्धती निश्चित न झाल्याने प्रशासनाच्या दिरंगाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ही उदासीनता ▶▶ पान २ वर

## डेमो हाऊस गैरव्यवहार प्रकरणात कारवाई टाळण्यासाठी

# डेमो हाऊसला दाखवले उमेद स्टॉल



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेकडून घरकुल योजनेत डेमो हाऊस बांधकामाच्या नावाखाली झालेल्या गैरव्यवहार प्रकरणात कारवाई टाळण्यासाठी डेमो हाऊसला उमेद स्टॉल म्हणून दाखवून वरिष्ठांची दिशाभूल केल्याचा प्रताप बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांनी केला असुन या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून दोषींवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांच्याकडे प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे केली आहे. घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने राज्य सरकारने प्रत्येक जिल्हा परिषद आवारात डेमो हाऊस उभारण्याचे निर्देश दिले होते. यासाठी सुमारे १ लाख ४० हजार ते जास्तीत जास्त ३ लाख रुपये खर्च अपेक्षित असताना, बीड जिल्हा परिषदेकडून ३० जानेवारी २०२४ व ५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्येकी ५ लाख रुपयांचे कार्यारंभ आदेश काढून एकूण १० लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याची तक्रार डॉ. ढवळे यांनी केली आहे. केवळ २६९ चौ.फुट बांधकामासाठी १० लाख रुपयांचा ▶▶ पान २ वर

### कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांचा प्रताप

## गाडी लावण्यावरून

# जिल्हा न्यायालयात वकिलाला मारहाण



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा न्यायालयाच्या आवारात ॲड. राम पांडुरंग डोंगरे हे न्यायालयीन कामकाज करत असतांना विनाकारण राधाकिसन रामचंद्र करपे यांनी व इतर ५ ते ६ महिला पुरुषांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी व ॲट्रॉसिटीची व विनयभंगाची केस दाखल करणेची धमकी दिल्यामुळे याचा जाहीर निषेध म्हणुन बीड जिल्हा वकील संघाचे सदस्यांनी दिनांक २५/०२/२०२६ रोजी न्यायालयीन कामकाजामध्ये सहभाग न घेण्याचा निर्णय घेतल्या आहे. बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य ॲड. राम पांडुरंग डोंगरे हे बीड जिल्हा न्यायालय परिसरात वकील व नोटरी म्हणुन काम करतात. ते आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या दरम्यान बीड जिल्हा न्यायालयात न्यायालयीन कामकाज करणेकरीता आले व ते त्यांचे काम करत असतांना त्यांच्या टेबलला लागुन राधाकिसन रामचंद्र करपे, रा. शाहूनगर, बीड ता.जि.बीड याने मोटार सायकल उभा केली, तेंव्हा ते त्यांना मोटार सायकल बाजुला लावा असे म्हणाले असता. मी तुमच्या सोरच गाडी लावेल, काय करायचे ते कर असे राधाकिसन रामचंद्र करपे हा म्हणाला त्यामुळे ॲड. राम डोंगरे यांनी स्वतः त्यांची मोटारसायकल बाजुला सरकवली तेंव्हा राधाकिसन करपे त्यांना म्हणाला की, तु वकील असुन लुच्या सारखे काम करतोस असे म्हणुन शिवीगाळ केली व त्यांच्यावर केसे करतो, थांब तुला दाखवतो असे म्हणुन रामचंद्र करपे तेथुन निघून गेला. त्यानंतर १० ते १५ मिनिटानंतर तो स्वतः व त्याच्यासोबत ३ बायका व इतर २ पुरुष घेवुन आला व ॲड. राम डोंगरे यांना अचानक मारहाण करायला सुरुवात केली व त्यांचा गळा दाबला. ॲड. राम डोंगरे यांनी त्यांचा गळा सोडवण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्या गळयाला सदरील महिलांचे नखे लागली व अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवुन ॲड. राम डोंगरे यांच्या विरोधात ॲट्रासिटीची व विनयभंगाची केस करतोत असे म्हणत ते तेथुन निघुन जातांना महिला म्हणत होत्या की, तुला बीड शहरात फिरु देणार नाहीत. तुझी नोटरी व वकिली करु देणार नाहीत अशा प्रकारची धमकी देवून राधाकिसन रामचंद्र करपे व इतर ३ महिला व २ पुरुष यांनी धमकी दिली आहे. तरी मे. ▶▶ पान २ वर

### अज्ञातांनी लावली गंजीला आग

**केज । प्रतिनिधी**

मळणी करण्यासाठी कापणी करून ठेवलेल्या राजमा पिकाच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने आग लावून पेटविल्याने शेतकऱ्याचे सुमारे ५६ हजार रु. चे नुकसान झाले आहे. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील सारूकवाडी येथील शेतकरी उत्तम बाबुराव सारुक याने त्याच्या शेतातील राजमा पिकाची कापणी करून मळणी करण्यासाठी गंज लावून ठेवली होती. दि. २२ फेब्रुवारी रोजी पाऊस पडण्याची शक्यता असल्याने त्यांनी कापणी केलेले राजमा ची गंज झाकून ठेवली होती. त्या नंतर दि. २३ ▶▶ पान २ वर

# वाटेने जावू देण्यास विरोध करून नवरा-बायकोला जबर मारहाण

**केज । प्रतिनिधी**

### सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

या वाटेने तुम्हाला वागू देणार नाही. असे म्हणून रस्त्याने जाण्या-येण्यास प्रतिबंध करून पती-पत्नीला काठी, पाईप आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्या प्रकरणी सात जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २३ फेब्रुवारी रोजी रात्री ८:३० वा. च्या तुकुचीवाडी ता. केज येथील सुमारास चिंगुबाई चौरे आणि त्यांचे पती आश्रूबा चौरे हे दोघे ते राहत असलेल्या शेतातील घरी जात असताना डोईफोडे वस्ती जवळ त्यांना त्यांच्या गावातील अशोक एकनाथ डोईफोडे, नामदेव एकनाथ डोईफोडे या दोघांनी अडवून आमच्या वाटेने तुम्ही तुमच्या घराकडे जायचे नाही. असे म्हणुन शिवीगाळ केली. नामदेव डोईफोडे याने चिंगुबाई चौरे यांना काठीने पाठीवर, उजवे पायाच्या मांडीवर, मारहान करून मुकामार दिला. तसे आश्रुबा चौरे यांना देखील काठीने मारहाण केली. तसेच श्रीराम एकनाथ डोईफोडे, त्याची पत्नी स्वाती श्रीराम डोईफोडे, छकुबाई नामदेव डोईफोडे या दोघींनी डोक्याचे केस पकडुन खाली पाडले आणि लाथाबुक्यांनी मारहान केली. तसेच प्रियका आशोक डोईफोडे हिने गॅसच्या पाईपने मारहान केली. तर एकनाथ ज्ञानोबा डोईफोडे याने अश्रूबा चौरे यांना चापटाबुक्यांनी मारहान केली. आणि जीवे मारण्याची ▶▶ पान २ वर

## राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

# ७/१२ उताऱ्यात होणार मोठा बदल

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य सरकारच्या महसूल विभागाने सातबारा उताऱ्यांबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ८५ अंतर्गत विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यावर लवकरच कार्यवाही सुरु होणार आहे. सरकारचा हा नवीन निर्णय काय आहे? हा जाणून घेऊयात. राज्यातील शेतजमिनीची मोठ्या प्रमाणावर सामाईक खात्यांमध्ये नोंद करण्यात आली आहे. या खात्यांमध्ये एकापेक्षा अधिक सहहिस्सेदार असले तरी सातबारा उताऱ्यावर संपूर्ण क्षेत्रफळ एका खातेदाराच्या ▶▶ पान २ वर

## अवकाळी व गारपिटीने शेती पिकांच्या झालेल्या

# नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा-धनंजय मुंडे



**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यात सोमवारी (तारीख २३) झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी, धाराशिव, नांदेड या जिल्ह्यांसह कोकण व पूर्व विदर्भात रब्बीतील गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला, फळपिके इत्यादींचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तात्काळ पंचनामे करावेत, अशी मागणी माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मांडली. यावेळी महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने शेतीपिकांचे नुकसान झाले आहे त्या सर्व जिल्ह्यातील प्रशासनास तातडीने ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# शेती,शिक्षण, आरोग्यावर लक्ष

जगातील सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान कार्यक्रमांपैकी एक असलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-२०२६' ला १६ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे प्रारंभ झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेचे औपचारिक उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी सहभागी स्टार्टअपच्या मंडपांना भेट देऊन त्यांच्या नवोपक्रमांबद्दलची माहिती जाणून घेतली. 'एआय'च्या माध्यमातून वास्तविक जीवनात शेती, आरोग्य आणि शिक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये भविष्यात होणारे बदल कसे असतील यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. दिल्लीमध्ये सुरू झालेली एआय परिषद २० फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. पुढील चार दिवसांत जगभरातील कंपन्या आपापले नवीनतम एआय प्रयोग सादर करतील. या परिषदेत सहभागी होणा-या सर्व निमंत्रित, तंत्रज्ञ, कंपन्या आणि शिष्टमंडळ प्रतिनिधींचे पंतप्रधानांनी विशेष आभार मानले आहेत. या शिखर परिषदेची थीम 'सर्वजन हिताय सर्वजन सुखाय' अशी असून याचा अर्थ 'सर्वांचे कल्याण आणि आनंद' असा आहे. मानवतेच्या प्रगतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरण्याच्या आपल्या सामाजिक वचनबद्धतेचे हे प्रतिबिंब आहे. हा विषय मानवी हिताला केंद्रस्थानी ठेवून एआयचा वापर करण्याच्या भारताच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा आहे, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे. परिषदेत सहभागी झालेले जगभरातील नेते, उद्योजक, संशोधक आणि धोरणकर्त्यांचे त्यांनी स्वागत केले. या परिषदेद्वारे भविष्याला आकार देण्यास मदत होईल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला. 'एआय इम्पॅक्ट समिट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी आयोजित करण्यात आलेली जगातील सर्वांत मोठी परिषद आहे. 'एआय'चा भारताच्या नजिकच्या भवितव्यावर कसा परिणाम होईल हे केंद्राकडून जाणीवपूर्वक घेतल्या जाणा-या धोरणात्मक निर्णयांवर अवलंबून असेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आपोआप होऊ देण्याऐवजी तो व्यापक रोजगारनिर्मितीशी जोडणे गरजेचे आहे, असे मत मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी मांडले. दरवर्षी लाखो नोक-या निर्माण होत असल्या तरी कौशल्याच्या कमतरतेमुळे तरुणांचा मोठा वर्ग उत्पादनक्षम रोजगारात सामावू शकत नाही. त्यामुळे शिक्षण, कौशल्यविकास आणि नियामक सुधारणांवर तातडीने भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'एआय' हा भारताच्या आर्थिक वाटाघाटीतील निर्णायक टप्पा आहे. त्याचे परिणाम अपघाती नसून राजकीय इच्छाशक्ती, सक्षम राज्ययंत्रणांवर अवलंबून असतील. भारताची लोकसंख्यात्मक लाभस्थिती ही संधीही आहे आणि इशाराही आहे. आर्थिक सुधारणांना विलंब झाला तर ही संधी दीर्घकालीन जोखमींमध्ये बदलू शकते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा अवलंब आपोआप होणार नाही. त्यासाठी स्पष्ट धोरण आणि तंत्रज्ञानाला मोठ्या प्रमाणात रोजगाराशी जोडण्याची वचनबद्धता आवश्यक आहे. देशाने मजबूत शिक्षण प्रणाली, उच्च गुणवत्तेचा कौशल्य विकास, कामगार केंद्रित सेवा क्षेत्रांचा विस्तार आणि नियामक अडथळे दूर करण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी निर्णायक पावले उचलली पाहिजेत. एआयचा अवलंब हा एक सहयोगी प्रयत्न असावा. ज्यामध्ये खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि धोरणकर्त्यांचा संयुक्त सहभाग आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नोक-या जाण्याची भीती नेहमीच व्यक्त होत असते परंतु तसे नाही, एआयच्या वापरामुळे नोक-या किंवा रोजगार कमी होण्याची शक्यता मुळीच नाही. मात्र, कामाच्या स्वरूपात बदल होऊ शकतो. लोकांकडे आता ऐकण्यासाठी वेळ नाही. ते ५० मिनिटांचा पॉडकास्ट ऐकू शकत नाहीत, सारांश जाणून घेण्यासाठी लोक एआय टूल्स वापरतात. 'इंडिया इम्पॅक्ट एआय समिट'साठी देशभरातून आणि जगभरातून अडीच लाखांहून अधिक सहभागींनी नोंदणी केली असून ती अपेक्षेपेक्षा अधिक आहे. दिल्लीतील एआयच्या 'महाकुंभा'ला जगभरातील नेते, स्टार्टअप्स, नावोन्मेषक आणि संशोधक एकत्र आले आहेत. या शिखर परिषदेवर केवळ भारतच नाही तर सारे जग नजर ठेवून आहे. हा कार्यक्रम भारताच्या जागतिक तांत्रिक भूमिकेसाठी एक ऐतिहासिक टप्पा आहे. एआयचा 'महाकुंभ' जागतिक सहकार्य आणि तांत्रिक नवोन्मेषाला एक नवीन दिशा देईल. ७० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रावर उभारण्यात आलेल्या एआय इम्पॅक्ट एक्स्पोमध्ये ३० हून अधिक देशांतील ३००हून अधिक कंपन्या त्यांचे एआय गॅझेट्स आणि तंत्रज्ञान प्रदर्शित करतील. त्यामुळे वास्तविक जीवनात एआय कसे कार्य करते ते जनतेला पाहता येईल.विद्यार्थी आणि तरुणांसाठी 'युवाई'आणि 'एआय फॉर ऑल' सारखे कार्यक्रम उपलब्ध असतील. या कार्यक्रमाद्वारे लोक त्यांचे शिक्षण आणि करिअर वाढवण्यासाठी एआय साधनांचा वापर कसा करायचा हे शिकू शकतील. एक्स्पोमध्ये एआय मॉडेल्स प्रदर्शित करण्यात आले असून शेतीमध्ये पीक रोग ओळखण्यास, रुग्णालयांमध्ये उपचार सुधारण्यास आणि भाषा अनुवाद सुलभ करण्यास मदत करण्याची प्रक्रिया पाहता येईल. भारत आणि परदेशातील स्टार्टअप्स कंपन्या आपली अद्वितीय उत्पादने प्रदर्शित करतील. जनतेला या नवोन्मेषकांशी थेट संवाद साधता येईल आणि भविष्यातील तंत्रज्ञान कसे दिसेल हे समजून घेता येईल. शिखर परिषदेत अनेक थीमॅटिक मंडप तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी लोकांना स्मार्ट हेल्थ मॉनिटरिंग आणि एआय ट्यूबर सारख्या एआय संचलित मशिन्स आणि सॉफ्टवेअरचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. सरकार वैद्यकीय विद्यार्थ्यांचे शिक्षण सुधारण्यासाठी ई-पुस्तके आणि एआय-आधारित शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता वाढविण्याच्या योजनेवर काम करत आहे. या उपक्रमाचा पहिला टप्पा लहान शहरे आणि ग्रामीण भागातील सुमारे ५७ सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांना व्यापणार आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये दुर्गम वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ई-पुस्तके, डिजिटल क्लिनिकल साहित्य आणि तांत्रिक अभ्यास साहित्य मिळविण्यात मोठ्या अडचणी येतात. म्हणून सरकार एआयच्या मदतीने या विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सामग्री पोहोचवण्यासाठी एक धोरण विकसित करत आहे.

## मराठवाड्यातील बळीराजाची कमाल

# शेतात पिकवला 'सोनेरी' कापूस; रंगीत कापसाला १० टक्के अधिक दर

**मुंबई** । वृत्तसेवा

खानदेश, मराठवाडा, विदर्भात शेतक-यांचा कापूस लागवडीकडे कल असतो. नगदी पिक असल्याने पांढ-या सोन्याच्या शेतीला बळीराजा पसंती देतो. त्यातून त्याला मोठा आर्थिक आधार मिळतो. पण मराठवाड्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांनी एक पाऊल पुढे टाकत चक्क सोनेरी रंगाच्या कापसाचं उत्पादन घेतलंय. छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यांतील ५ तालुक्यात हा प्रयोग झालाय. सुमारे १०० एकरवर बीटी-७४६ या वाणाची लागवड करण्यात आली. हा कापूस साध्या कापसापेक्षा वेचणीला सोपा आहे. या वाणाची रोगप्रतिकारकशक्तीही तुलनेत चांगली आहे. उत्पन्नही अधिक आहे. सुमारे १६ गावांमध्ये दीडशे शेतकऱ्यांनी या कापसाचं उत्पादन घेतलंय. सुमारे ५००



क्विंटल सोनेरी कापसाची खरेदी झाली आहे. विशेष म्हणजे सोनेरी कापसाला १० टक्के अधिक दर मिळतोय. दुधना हायटेक कृषी प्रोड्यूसर कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी सोनेरी रंगाच्या कापूस उत्पादनासाठी पुढाकार घेतला आहे. शेतकऱ्यांनी यंदा सुमारे २० गुंठ्यांपासून तब्बल चार एकरावर सोनेरी कापसाची लागवड केली. प्रचलित कापूस लागवडी प्रमाणेच लागवड करत खत, कीटकनाशकांचे व्यवस्थापन ठेवलं. यात शेतकऱ्यांना ५ क्विंटल ते १५ क्विंटलपर्यंत एकरी उत्पादन मिळालंय. गतवर्षी प्रयोग म्हणून चार एकरांवर नैसर्गिक सोनेरी रंगाचा कापूस लागवड करण्यात आली होती. आता हेच क्षेत्र १०० एकरपर्यंत वाढलंय. गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय बाजारात असलेली वाढती मागणी लक्षात घेता भविष्यात सोनेरी कापसाचे क्षेत्र वाढणार आहे.आणि त्यातून बळीराजालाही सोन्याचे दिवस येणार यात शंका नाही.

# फरार आरोपीच्या अटकेसाठी पिडित जाधवर कुटुंबिय उपोषण करणार

**बीड** । प्रतिनिधी

बीड जीएसटी कार्यालयामधील मयत अधिकारी सचिन जाधवर प्रकरणातील फरार आरोपी प्रदीप फाटे याला तातडीने अटक करण्यात यावी,अन्यथा २५ फेब्रुवारी २०२६ पासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा मयुरी सचिन जाधवर यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षकांना लेखी निवेदन दिले आहे. बीड ग्रामीण पोलीस तपाशी अधिकारी फाटे यांना अटक करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप मयत सचिन जाधवर यांच्या पत्नीने केला आहे. दिलेल्या निवेदनानुसार, सचिन जाधवर यांचा १७ जानेवारी २०२६ रोजी मृत्यू झाला असून २३ जानेवारी रोजी संबंधित गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपी



प्रदीप फाटे याला अटक करण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १३ फेब्रुवारी रोजी निर्देश दिल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात न्यायालयाने ११ फेब्रुवारी रोजी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळल्याचा दावा करण्यात आला आहे. तरीही संबंधित आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. आरोपीला अटक करण्यात पोलिसांकडून टाळाटाळ होत असून आरोपीला संरक्षण दिले जात असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. आरोपीला तात्काळ अटक न झाल्यास २५ फेब्रुवारीपासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर पीडित कुटुंबीय व नातेवाईक आमरण उपोषणास बसणार असल्याचे मयुरी जाधवर यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या प्रकरणाकडे लक्ष देऊन न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पान १ वरून

### मराठा आरक्षणात...

अर्ज प्रमाणपत्र प्राप्त झाल्याची माहिती समोर आली. त्यावर मनोज जरांगे यांनीही नाराजी व्यक्त केली होती.

### सहा महिन्यांच्या...

नाही तर आणखी काय? असा सवाल आता राजकीय व सामाजिक वर्तुळातून उपस्थित होत आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी या दिरंगाईबाबत खुलासा करावा, अशी मागणी देखील होत आहे.

### डेमो हाऊसला दाखवले...

खर्च दाखविण्यात आल्याने हा प्रकार घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात दिलेल्या लेखी तक्रारीची दखल घेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांनी चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सय्यद मोमीन यांनी सादर केलेल्या अहवालात डेमो हाऊस हे घरकुल लाभार्थ्यांसाठी नसून उमेद स्टॉल असल्याचे नमूद करून मूळ उद्देश लपविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. ढवळे यांच्या मते, संबंधित अहवालात डेमो हाऊस घरकुल योजनेअंतर्गत बांधण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आला असून, त्यामुळे मंजुरी देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची पाठराखण होत असल्याचा संशय निर्माण झाला आहे. या प्रकरणात जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी संबंधित प्रकरणात चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती डॉ. ढवळे यांनी दिली.

### वाटेने जावू देण्यास...

धमकी दिली. चिंगुबाई चौरे यांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात आशोक एकनाथ डोईफोडे, नामदेव एकनाथ डोईफोडे, श्रीराम एकनाथ डोईफोडे, स्वाती श्रीराम डोईफोडे, छकुबाई नामदेव डोईफोडे, प्रिंयका आशोक डोईफोडे आणि एकनाथ ज्ञानोबा डोईफोडे या सात जणांच्या विरुद्ध गु. र. नं. ८३/२०२६ भा. न्या. सं. १२६(२), १८९(२), १९१(२), ११५(२), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार पुरुषोत्तम शेप हे तपास करीत आहेत.

### जिल्हा न्यायालयात...

साहेबांना विनंती की, ॲड. राम पांडुरंग डोंगरे यांना राधाकिसन रामचंद्र करपे व इतर ३ महिला व २ पुरुष यांनी हानमार व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवुन नोटरी व वकिली करु देणार नाहीत अशा प्रकारची धमकी व तसेच ॲट्रॉसिटीची व विनयभंगाची केस करुत अशी धमकी राधाकिसन रामचंद्र करपे व इतर ३ महिला व २ पुरुष यांनी दिल्यामुळे याचा जाहीर निषेध म्हणुन बीड जिल्हा वकील संघाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी दिनांक २५/०२/२०२६ रोजी न्यायालयीन कामकाजामध्ये सहभाग न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### नुकसानीचे तात्काळ...

पंचनामे करण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून दिले जातील, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात दिली. अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे गहू ज्वारी

## पान १ वरून

अक्षरशः जमीनदोस्त झाली असून आंबा, डाळिंब या फळांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच द्राक्ष, टरबुज अशा फळपिकांना देखील मोठा फटका बसला आहे. त्यामुळे याची तात्काळ दखल शासनाने घेण्याची गरज असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. विधिमंडळात स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून आ. विजय वडेट्टीवार यांनी देखील अवकाळी व गारपिटीने झालेल्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र झालेल्या नुकसानीची व्यापकता अधिक असल्याने धनंजय मुंडे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. आमदार अभिमन्यू पवार यांनीही हा विषय मांडला. बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई यांसह माजलगाव, धारूर, केज इत्यादी तालुक्यांमध्ये देखील अवकाळीचा फटका बसला असून प्रशासनाने तातडीनं पंचनामे करून शासनास नुकसानीचे अहवाल सादर करावेत, अशी आग्रही मागणी धनंजय मुंडे यांनी सभागृहात केली. त्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर देत संबंधित नुकसानग्रस्त सर्व जिल्ह्यात तातडीने पंचनामे करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

### ७/१२ उताऱ्यात...

नावासमोर दिसते. या शेतजमिनीवर प्रत्येक सहहिस्सेदारांचा ठराविक हिस्सा असतो. पण याबाबतची स्वतंत्र नोंद नसते. ज्यावेळी शेतकरी फेरफार नोंदी,जमीन व्यवहार, कर्जप्रकरणे किंवा सरकारी विविध योजनांसाठी अर्ज करण्यात येतो तेव्हा एकूण क्षेत्रफळाच्या तफावतीमुळे कामे होण्यास विलंब लागतो. काही गैरसमज निर्माण होऊन आणखी कागदपत्रे देण्यास धावाधाव करावी लागते. आता ही दमछाक थांबणार आहे, कारण महसूल विभागाने याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. आता प्रत्येक खातेदाराच्या नावासमोर त्याच्या हिश्शाचे स्वतंत्र क्षेत्र स्पष्टपणे नमूद केले जाणार आहे.खाते विभाजनाची प्रक्रिया सुलभ आणि जलद व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. याबाबतचा सरकारी आदेश काढण्यात आला आहे. ✻ अर्ज करावा लागणार : सातबारा उताऱ्यावरील बदलासाठी महसूल विभागाकडून तालुका व मंडळ पातळीवर विशेष शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. यासाठी सहहिस्सेदारांना अर्ज करावा लागणार आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांचा या मोहिमेत सहभाग मिळावा, यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचेही आदेश देण्यात आला आहे. ✻ फार्मर आयडी प्रक्रिया सुरु : ✻ सध्याच्या नोंदींमध्ये सर्व खातेदारांच्या नावासमोर एकूण क्षेत्र दाखवले जात असल्याने तांत्रिक अडथळे निर्माण होत होते. ✻ नवीन निर्णयामुळे प्रत्येक हिस्सेदाराच्या वाट्याचे क्षेत्र स्वतंत्रपणे नमूद होणार असल्याने फार्मर आयडी प्रक्रिया सुलभ होणार आहे. ✻ कृषी विभागाकडून शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्याचे काम सुरू आहे. ✻ विविध शासकीय योजनांचा लाभ अचूक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा आयडी महत्त्वाचा मानला जातो. ✻ फार्मर आयडी तयार करताना संबंधित शेतकऱ्याच्या नावावर असलेले अचूक क्षेत्र नमूद करणे आवश्यक असते. ✻ शेतकऱ्यांना होणार फायदा: ✻ प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या हिश्शानुसार स्वतंत्र नोंद मिळणार आहे. ✻ कृषी विभागाच्या योजनांचा लाभ थेट आणि अचूक मिळू शकेल. ✻ जमीन खरेदी-विक्री करताना किंवा बँक कर्जासाठी अर्ज करताना क्षेत्रफळाबाबतची तांत्रिक अडचण दूर होईल. ✻ ई-पीक पाहणी प्रक्रियेत स्वतःच्या हिस्स्याच्या जमिनीची अचूक माहिती नोंदवता येणार असल्याने पारदर्शकता वाढेल.

### अज्ञातांनी लावली...

फेब्रुवारी रोजी सकाळी ते शेतात गेले असता कोणी तरी अज्ञातांनी त्यांच्या राजम्याच्या पिकाच्या गंजीला आग लावून नुकसान केल्याचे आढळून आले. यात त्यांचे सुमारे ५६ हजार रु. चे नुकसान झाले आहे. उत्तम सारूक यांच्या तक्रारी वरून अज्ञात व्यक्ती विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ८४/२०२६ भा. न्या. सं. ३२६ (एफ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस जमादार तुकाराम मुरकुटे हे तपास करीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



## थोडक्यात...

### सौ के.एसके महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगे बाबा जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड : सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड येथे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगे बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. अन्सरउल्ला खान, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. काकडे तसेच पर्यवेक्षक श्री. जालिंदर कोळेकर यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी आपल्या मनोगतात संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, माणसात देव शोधणारा या संताने लोकांकडून मिळालेल्या देणग्यांचा उपयोग रंजले-गांजले, अनाथ व गरजूंसाठी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम व शाळा उभारण्यासाठी केला. त्यांच्या समाजप्रबोधन व स्वच्छता अभियानाच्या कार्याला जयंतीदिनी शतशः नमन, असे त्यांनी प्रतिपादन केले. डॉ दुष्यंता रामटेके यांनी संत गाडगे बाबा यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या स्वच्छतादूत व राष्ट्रनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### काठोडा गाव येथील मातोश्री कॅम्पसमध्ये संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भव्य स्वच्छता मोहीम



**बीड । प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक आणि स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून बीड तालुक्यातील काठोडा येथील 'मातोश्री कॅम्पस' आणि परिसरात आज (२३ फेब्रुवारी) भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता हीच खरी सेवा हा गाडगेबाबांचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवत आणि गावकऱ्यांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व संस्थे अंतर्गत सर्व सहभागी महिलाना साडी वाटप करण्यात आली. गाडगेबाबांनी आयुष्यभर हातात खराटा घेऊन गावेच्या गावे स्वच्छ केली आणि कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान व अस्वच्छता दूर करण्यासाठी कसे प्रयत्न केले, याचे महत्त्व आजच्या पिढीला समजावून सांगण्यात आले. केवळ आजचा दिवस नाही, तर दररोज आपला परिसर स्वच्छ ठेवणे हीच बाबांना खरी आदरांजली ठरेल, असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी उपस्थित संस्थेचे तेजस्विनी पवार,सदस्य व गांवकरी होते.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी



**नेकनूर । प्रतिनिधी**

दिनांक २३ फेब्रुवारी रोजी प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ.कलाने के.के. हे उपस्थित होते. सर्वप्रथम संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा.मुजावर एस.टी. यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. कलाने के.के. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे म्हणाले की संत गाडगे महाराज यांनी आपल्या देशाला स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले त्यांनी गावे गावी फिरवून स्वच्छता ही आपल्या आरोग्यासाठी किती महत्त्वाचे आहे ते त्यांनी स्वतःच्या कार्यातून दाखवून दिले त्यांचा आदर्श आज आपण घेतला पाहिजे स्वच्छता केली तरच आपले आरोग्य चांगले राहील यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे याची सुरुवात आपण आपल्या घरापासून केली पाहिजे असे सांगितले अध्यक्षीय समारोप करताना डॉ. ढास डी.के. असे म्हणाले की विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या विचाराचे आपण पाईप झालो पाहिजे त्यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन स्वच्छतेचे महत्व सांगण्याचे काम केले त्यांनी समाज जागृती करण्याचे काम केले त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे स्वच्छता हीच राष्ट्रसेवा याप्रमाणे आपण मोहीम राबवली पाहिजे असे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. रामरुले डी.के. यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी अचानक परीक्षा केंद्रावर

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) केंद्रास आज जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष दिलीप स्वामी यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. आज इयत्ता १२ वीचा अर्थशास्त्र या विषयाचा पेपर होता.

सिडको येथील पद्मश्री वसंतदादा पाटील उच्च माध्यमिक विद्यालय व न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा या दोन परीक्षा केंद्रांना जिल्हाधिकारी स्वामी यांनी अचानक भेट देऊन पाहणी



केली. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी परीक्षा संचालनाची संपूर्ण प्रक्रिया, परीक्षा दालनातील शिस्त, आसनव्यवस्था, गोपनीयता आणि पारदर्शकता यांचा सविस्तर आढावा घेतला. केंद्रांवर कार्यान्वित असलेली सीसीटीव्ही यंत्रणा, त्याची स्टोरेज व्यवस्था तसेच नियंत्रण प्रणालीची तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांना पुरेसा उजेड, हवा व पिण्याचे पाणी याची व्यवस्था उपलब्धता याबाबत पाहणी केली. उत्तर पत्रिका सोडविण्यासाठी असलेले शांतता व एकाग्रतेचे वातावरण पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

# जि. प. प्राथ. शाळा महाजनवाडी शाळेचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

### छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बीड येथे जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या

**बीड । प्रतिनिधी**

या क्रीडा स्पर्धेत लहान गट मुली लंगडी या क्रीडा प्रकारात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवला, तसेच वैयक्तिक खेळातील लांब उडी मध्ये शाळेची कु.वैष्णवी श्रीकृष्ण भोसले हिने लहान गटातून जिल्ह्यातून सर्व तृतीय क्रमांक मिळवीत घवघवीत यश मिळवले. या साठी शाळेचे मुख्याध्यापक सर्जे राव आंधळे , जेष्ठ शिक्षण विस्तार



अधिकारी श्रीमती गंगाखेडकर मॅडम , केंद्रप्रमुख श्री.दीपक घाटे , सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेशजी ढवळे गावचे सरपंच ,उपसरपंच तसेच सर्व ग्रामस्थ यांच्या प्रेरणेने महाजनवाडी शाळेतील शिक्षक तुकाराम माळकर सर ,आदिनाथ काटकर सर , रेश्मा रोहिटे मॅडम , धनश्री गोसावी मॅडम यांच्या अथक परिश्रमाने हे यश मिळवले या यशा बद्दल शाळा व्यवस्थापन समिती,महाजनवाडी सर्व पालक आणि ग्रामस्थ यांनी सर्व खेळाडूंचे भरभरून अभिनंदन केले.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड संचलित ग्रामीण रुग्णालय मातोश्री कॅम्पस काठोडा ता.जि.बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली यावेळी सिनियर सिटीझन आशा प्रभाकर आगे (वय ८२)यांनी महाराज्यांच्या कार्याबद्दल, शौर्यबद्धल, मार्गदर्शन केले व तेजस्विनी पवार यांनीही महाराजांबद्दल सर्वांना मार्गदर्शन केले,संस्थेच्या वतीने आजीबाई यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष सौ.छाया दिलीप पवार,आजी,दिलीप पवार,व गावकरी होते.*

# सकल भावसार समाजाचा भव्य सामूहिक धार्मिक सोहळा

**वडवणी । प्रतिनिधी**

श्री हिंगलाज मातेच्या आशीर्वादाने भावसार समाजाच्या एकतेचे, श्रद्धेचे आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारा भव्य श्री हिंगलाज माता महोत्सव दिनांक ७ मार्च २०२६ रोजी तेर जवळील श्री क्षेत्र हिंगळजवाडी ,ता. जिल्हा धाराशिव येथे सकल भावसार समाजाच्या भव्य सांस्कृतिक धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून, पाकिस्तान स्थित बलुचिस्तान येथील हिंगलाज माता उत्सवाच्या धर्तीवर हा सांस्कृतिक धार्मिक सोहळा सकल भावसार समाजाचा संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. तरी या धार्मिक सोहळ्यास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन सकल भावसार समाज समिती तेर (धाराशिव) यांच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की दिनांक ७ मार्च २०२६ शनिवार रोजी सकाळी आठ वाजल्यापासून महोत्सवास प्रारंभ होणार असून श्री हिंगलाज मातेची विधिवत पूजा व महाआरती ,विविध धार्मिक विधी, मंगल कार्यक्रम तसेच प्रवचन भजन ,व किर्तन यांचे



आयोजन करण्यात आले आहे. यानंतर उपस्थित भावसार समाज बांधवांचे स्वागत तसेच मान्यवर समाजसेवक व लोकप्रतिनिधींचा सत्कार या वेळी करण्यात येणार आहे. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सकल भावसार समाज धार्मिक सोहळ्यास तन, मन आणि कुटुंबासह उपस्थित रहावे. हेच व्रत असल्याची भावना व्यक्त करत, सर्व समाज बांधव ,माता -भगिनी, युवक- युवती व बालगोपाल यांनी या पवित्र महोत्सवास कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहत श्री. हिंगलाज मातेचा आशीर्वाद घ्यावा व समाजाच्या ऐक्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन सकल भावसार समाज हिंगलाज महोत्सव आयोजन समिती तेर (धाराशिव) यांच्या वतीने करण्यात आले आहे. `या महोत्सवाच्या निमित्ताने भावसार समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला नवे बळ मिळणार असून समाजबंध दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांची जंयती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात झाले. या प्रसंगी यु.बी.पवळ यांनी आपले विचार प्रतिपादन केले. या प्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज,



आदर्श राज्यकर्ता या विषयी विद्यार्थ्यांनी व्यापक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख यु.बी. पवळ यांनी प्रास्ताविक श्रीम. एन.जी.मुंडे आणि आभार डब्ल्यु. एस.वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.बी. घुले आणि सय्यद सर यांनी प्रयत्न केले. या प्रसंगी आनंद छात्रायालयाचे अधिक्षक डी.व्ही. खरसाडे, बहुसंख्य विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी भारत कोळेकर उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.



*राजर्षी शाहू कन्या विद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात*

# सावळेश्वर ट्रॅक्टर्सची विक्रमी झेप कंपनीच्या टार्गेट पेक्षा दुप्पट ट्रॅक्टर ची विक्री

### ●ग्राहकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद वर्षात ४४४ ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री

**आष्टी । प्रतिनिधी**

शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग जगतामध्ये गगन भरारी घेत शेकडो नागरिकांच्या हाताला काम मिळवून देणारे, स्वकर्तृत्वावर आपले वेगळे स्थान निर्माण करणारे उद्योजक रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाचे आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स या स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टरचा शुभारंभ मागील वर्षी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला होता. विशेष आकर्षक ग्राहकांना सवलत व तत्पर सेवा दिल्याने आष्टी तालुक्यात स्वराज ट्रॅक्टर ला मोठी मागणी वाढली अन जिकडे-तिकडे स्वराज ट्रॅक्टरच दिसु

### तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत



**आमच्या शोरुमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक आणि हितचिंतकांचे मनापासून आभार! तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा आधार आहे. गेल्या वर्षांपासून तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत. भविष्यातही उच्च दर्जाची तत्पर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. - रमेश दादा आजबे (सावळेश्वर ट्रॅक्टर्स धोंडे पेट्रोल पंपा समोर नगर रोड आष्टी )**

लागला. ग्राहकांनी खरेदी करण्यास पसंती दिल्याने सावळेश्वर ट्रॅक्टरने कंपनीने ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरचे विक्रमी विक्री करून गावागावात शोरूम व कंपनीचे नाव पोहोचले आहे. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल सावळेश्वर ट्रॅक्टर चे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ग्राहकांचे आभार मानले पहिल्या वर्धापन दिन मेहनत घेणाऱ्या सर्व स्टाफ कर्मचाऱ्यांसोबत केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन



ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी शहरात मागिल वर्षी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला. अनेक ट्रॅक्टरच्या विविध कंपन्या असून वार्षिक ट्रॅक्टर विक्री करण्यासाठी डीलरला टारगेट दिले जाते.ते म्हणजे सावळेश्वर ट्रॅक्टर वर्षभर भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणाऱ्यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या १ वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब ,ब्रांच मॅनेजर मुळे साहेब ,मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे, अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड,आशा पवार, रिसेप्शन रेणुका वैद्य, जयश्री सांगळे, लखन आजबे, आकाश शेळके, जालिंदर भवर, सागर निकरड, श्रीकांत गोले, ऋषी गायकवाड, रणजीत मुंडे, नामदेव आजबे, रवींद्र खंडागळे, ओमकार सोले, अशोक खंडागळे,धीरज रोडे, सुरज गोलेकर, स्वप्निल बरकडे, नामदेव हराळ, इब्राहिम पठाण, हनुमान घरगीणे, विश्वकर्मा कुमार,पुजा साठे,आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने ट्रॅक्टरचा विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ •



# शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांची बक्करवाडी भव्य मिरवणूक

## बीड, मौजवाडी फाटा, ढेकाणमोह, टेकडी फाटा, येथे स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी मठाधिपती महंत गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांची दोन धाम यात्रा रामटेक नागपूर, मैहर शरद देवी, प्रयागराज, वाराणशी (काशी) गोरखपुर, पशुपतिनाथ नेपाळ,मनोकामनादेवी नेपाळ, चंद्रगिरी नेपाळ, भोलेश्वार नेपाळ, अयोध्या, चित्रकूट, मंदाकिनी नदी आरती, उज्जैन महाकालेश्वर, काळभैरव, ओंकारेश्वर, मुक्ताई नगर, बीड असा दोनधाम यात्रा प्रवास पूर्ण झाल्यावर मंगळवारी बीड येथे आगमन झाले. शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे बीड मध्ये भव्य स्वागत करण्यात आले. बक्करवाडी ग्रामस्थांच्या वतीने ढोल ताशा लेझीम वाजवत गावातील लहान, थोर,



महिला व पुरुष मंडळींनी बक्करवाडी फाटा ते बक्करवाडी येथे रथा मधून भव्य मिरवणूक गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांचे दोन धाम यात्रा पूर्ण झाल्याबद्दल काढण्यात आली. तसेच संपूर्ण गावामध्ये महाप्रसादाची पंगत आयोजन करण्यात आले.

मौजवाडी फाटा येथे मौजवाडी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. ढेकणमोहा ग्रामस्थांच्या वतीने ढेकणमोहा येथे स्वागत करण्यात आले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील भाविक भक्तांनी गोरक्षनाथ टेकडी फाटा परिसरात फटाके फोडत बाबांचे भव्य स्वागत करण्यात आले.

बीडच्या वेशात खांडे व लांडे कुटुंबाकडून हॉटेल सनराइज् येथे स्वागत समारंभ घेण्यात आला. बीड येथे नवनाथ बाबा समवेत दोन धाम यात्रा करणाऱ्या घुमरे कुटुंबाकडून स्वागत करण्यात आले.



➧ गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या १५ दिवसाच्या दोन धाम यात्रा मध्ये रमेश घुमरे यांच्या कुटुंबाने बाबाची खूप सेवा केली.

# दोन बहिणींच्या अपहरणाचा कट

## छोट्या बहिणीचं जबरदस्त धाडस, 'असा' उधळला डाव

**बीड । प्रतिनिधी**

महिला अत्याचाराच्या घटना राज्यात कुठे ना कुठे होत आहेत. त्यात बीडमध्ये दिवसा-ढवळ्या दोन तरुणींच्या अपहरणाची बातमी समोर आली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही सख्ख्या बहिणी होत्या. बीडच्या माजलगावमध्ये ही घटना घडली. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मात्र या दोन बहिणी मधील लहान बहिणीने दाखवलेलं धाडस आणि प्रसंगावधान कौतूक करण्या सारखेच आहे. त्यामुळे अपहरणाचा डाव उधळला गेला. दोन्ही तरुणी या सुरक्षित आपल्या घरी ही परतल्या.

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. माजलगाव शहरात दिवसाढवळ्या दोन सख्ख्या बहिणींच्या अपहरणाचा थरार उघडकीस आला आहे. सुंदरराव सोळंके महाविद्यालयासमोर तीन आरोपी उभे होते. त्यांचा या दोन बहिणींच्या अपहरणाचा डाव होता. दोन्ही मुली ज्या वेळी त्यांच्या समोर आल्या त्यावेळी या तिघांनी ही त्यांच्यावर झडप टाकली. त्यांना जबरदस्तीने कारमध्ये कोंबण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी लहान बहिणीने डोकं लावलं. तिने त्यांना प्रतिकार केला. शिवाय जोरजोरात आरडाओरड केला. त्यामुळे तिथे एकच गोंधळाची स्थिती निर्माण झाली. मुलींना कारमध्ये टाकायचे आणि पळ काढायचा असा त्यांचा डाव होता. पण त्यांच्या मनासारखे काही झाले नाही. लहान बहिणीने जबर प्रतिकार आणि आरडाओरडा केला. तो ऐकून तिथं नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले. त्यांना हा प्रकार काही तरी भयंकर असल्याचं जाणवलं. नागरिक मदतीला धावले आणि अपहरणकर्त्यांचा डाव उधळला. त्यानंतर संतप्त नागरिकांनी आरोपींना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी तिघांना अटक करून त्यांचे वाहन ही जप्त केले आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे माजलगावमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे. दरम्यान कौटुंबिक कलहातून हा कट रचला गेला होता हे तपासात समोर आले आहे. याबाबत बीडचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी माहिती दिली आहे. तर सामाजिक कार्यकर्ता सायली पवार यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी उपाय योजना होणं गरजेचं असल्याचं म्हटलं आहे.

# केज तालुक्यातील दहिफळ ग्रामपंचायतीच्या सरपंचाची बोगस सही मारूण राबवली निविदा प्रक्रिया

• बोगस सही करणार्यांवर गुन्हा दाखल करण्याची पोलीस निरिक्षकांकडे सरपंचाची तक्रार

## • सरपंचाची बोगस सही करणारा तो व्यक्ती कोण ?

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील दहिफळ (वड.) ग्रामपंचायतीमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे.सरपंचांची बनावट (खोटी) सही करून निविदा (टेंडर) प्रक्रिया राबवण्यात आल्याची गंभीर तक्रार दहिफळ (वड) च्या सरपंच सौ.अनिता शशिकांत गदळे यांनी केजचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली आसून सबंधित प्रकाराची चौकशी करूण दोषीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.या प्रकरणामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. केज तालुक्यातील ग्रामपंचायत दहिफळ (वड) अंतर्गत जिल्हा परिषद शाळेमध्ये डी.पी.डी.सी निधीतून एक शाळाखोली बांधकाम मंजूर झाले होते.या कामाचा प्रशासकीय आदेश ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राप्त झाला होता.या कामाची

**सदरील प्रकरणात माझ्या परस्पर माझी खोटी सही करणाऱ्या आणि करायला लावणाऱ्या संबंधित व्यक्तींची सखोल चौकशी करूण दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा.**

निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर कु.प्रिती हरिदास तांबडे (रा. शिरूर घाट) यांनी टेंडर प्रक्रियेस लागणार्या कागदपत्रासाठी सरपंचास कसलिही कल्पना न देता सरपंचाची स्वाक्षरी पूर्णपणे बोगस केली आहे.सदरील टेंडर प्रक्रियेसाठी लागणार्या कागदपत्रांवर आपण सही केली नसल्याचे सरपंच सौ.अनिता शशिकांत गदळे यांनी पोलिस निरीक्षकांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.तसेच त्यांनी तक्रारीत पुढे म्हटले आहे की,प्रशासकीय अधिकार्यांची यामध्ये निव्वळ फसवणूक केली आसून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय निधीचा गैरवापर करण्यासाठीच हा अट्टाहास असून काही अधिकार्यांच्या संगनमताने सरपंचांच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम या माध्यमातून केले आहे.सदरील गैरप्रकार कोणी केला,याचा योग्य तो पोलिस तपास करूण सबंधित दोषी व्यक्तींवर गुन्हे दाखल करूण कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सदरील तक्रारीची प्रत आ.नमितताताई मुंदडा,जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती केज यांना पाठवण्यात आली आहे.दरम्यान एका बाजूला पारदर्शक कारभाराचा आव आणणारे जिल्हा प्रशासन थेट सरपंचाची बोगस स्वाक्षरी करूण बोगसगीरी करणार्यावर काय कारवाई करणार याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# भारताला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज : प्रा.डॉ. पांडुरंग सुतार

**बीड । प्रतिनिधी**

संकटांवर मात करत संघटनशक्ती वाढवणे, स्त्रीसन्मान राखणे, सुशासन प्रस्थापित करणे हे आजच्या समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे. भारताला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ. पांडुरंग सुतार यांनी केले. अस्मिता प्रतिष्ठान, विठ्ठलाई फॉउंडेशन व आर बी डिजिटल च्या वतीने अस्मिता एजुकेशनल हब येथे आज



छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आर.बी. डिजिटलचे पदाधिकारी व अस्मिता प्रतिष्ठान चे अध्यक्ष डॉ. संभाजी शिंदे हे होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. पांडुरंग सुतार हे होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. गणेश खाडे आणि ॲड.सतीश वडमारे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. पांडुरंग सुतार यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी कार्याचा आढावा घेत उपस्थित नागरिकांना त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले. शिवाजी महाराजांचे विचार आजच्या समाजासाठी प्रेरणादायी असून एकता, शिस्त आणि देशप्रेम जोपासण्याची गरज असल्याचे सांगितले तसेच शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकत सामाजिक जबाबदारीची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक असल्याचे नमूद केले.



*वडवणी तालुक्यातील चिखलबीड सर्कलमध्ये चिंचवन, कोठारबन, सोन्नाखोटा, चिखलबीड, पिंपळटक्का इ. गावात आवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.*

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणी शिबिर; ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आज दि.२४ वार मंगळवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सूर्या नेत्रालय येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. अंजली गायकवाड यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर



उपस्थित होते. शिबिरामध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली. गरजू रुग्णांना अल्प दरात चष्म्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच डोळ्यांच्या विविध समस्यांचे निदान करून रुग्णांना योग्य उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली चिटकुलवार, डॉ. ऋषिकेश आंधळे, डॉ. प्रमोद गोरे (सीएचओ, बोरखेड), आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे, आरोग्य सेवक वीर सापते, प्रयोगशाळा तज्ज्ञ ऋषिकेश शेळके, औषध निर्माता जे. एस. कंचार, परिचारिका सोनाली शिंदे, व्ही. बी. भांडवलकर, एल. एच. कर्मचारी सुरेश अवसरे तसेच सेविका ज्योत्स्ना शिंदे यांनी विशेष सहकार्य केले. या नेत्र तपासणी शिबिरामुळे ग्रामस्थांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## जाहीर नोटीस

**महत्वाचे कागदपत्रे हरवले आहेत.**

सर्वसामान्यांस सूचित करण्यात येते की, माझे नोटरी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (नाव: ॲड नारायण पी. भानुदासराव लोणकर, नोंदणी क्रमांक: ८६३, चे जारी दिनांक: १९८८ बीड जिल्हा न्यायाल ते विद्यानगर पं. येथील घरी येत असतांना हरवले. मी सर्वतोपरी शोध घेतला परंतु सापडले नाही. जर कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. जर कोणी या प्रमाणपत्राचा गैरवापर केला तर मी जबाबदार राहणार नाही.

**नाव: ॲड. नारायण भानुदास लोणकर**
**पत्ता: माने कॉम्पलॅक्स जवळ**
**विद्यानगर, पश्चिम. बीड. ता. जिल्हा. बीड.**
**फोन नं. :- ९४२२७४१२२३**